VOL- VII ISSUE- VII JULY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे उद्गाते

**प्रा. डॉ.त्रिशला कदम**
श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय,
इचलकरंजी

भारताच्या इतिहासात 'युगप्रवर्तक पुरुष' म्हणून नांव कोरले गेलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 14 एप्रिल हा जन्मदिवस! भारतीय घटनेचे शिल्पकार, दलित आणि तळागाळातील दीनदुबळयांचे प्रेषित, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अलौकिक आणि थोर विचारवंत म्हणून जनमान्य झाले आहेत. बाबासाहेबांचा जन्म सामाजिक न्याय, सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यापासून वंचित झालेल्या समाजात झाला होता. डॉ. आंबेडकरांनी अत्यंत कठोर परिश्रमाने तसेच अथक प्रयत्नाने आणि जाज्वल्य निष्ठेने भारतात आणि विदेशात उच्च शिक्षण घेतले आणि पदव्यांची माळा गळयात घातली.

डॉ. बाबासाहेबांचे नेतृत्व त्रिविध स्वरुपाचे असल्याचे दिसून येते. स्वत:च्या जातीचे पुढारी, समग्र अस्पृश्यांचे प्रतिनिधी आणि राष्ट्रीय नेते अशा तीन प्रकारच्या भुमिका त्यांनी पार पाडल्या. 1930 च्या आधीपासून भारत सरकारच्या दृष्टीने ते महार जातीचे मार्गदर्शक , गुरु व कर्ता- करविता होते. राष्ट्रीय काँग्रेसने देखील अस्पृश्यांचा नेता म्हणूनच त्यांचेकडे पाहिले. अनुसुचित जातीचे भवितव्य घडविण्याच्या भारताच्या इतिहासात त्यांनी फार महत्त्वपूर्ण वाटा उचलला. राष्ट्रीय पुढारी म्हणून भारताचे भवितव्य साकार करण्याच्या प्रत्येक महत्वपूर्ण घटनेत त्यांनी वाटा उचलला. शासनाचा प्रतिनिधी म्हणून मजुरांच्या समस्या सोडविणारे व त्यांचे हित संरक्षण करणारे कायदे त्यांनी केले आणि सर्व भारतीय जनतेस लागू होणारी व सर्व घटकांना संम्मत असणारी टिकावू स्वरुपाची घटना त्यांनी भारतास दिली.

भारतातील संबंध स्त्री समाज एकेकाळी गुलाम होता. हे खरे असले तरी आधुनिक काळात हे चित्र बदलू लागले आहे. त्या परिवर्तनाची गती अगदी सावकाशीने पुढे जाणारी असली तरी उच्च वर्गीय, शहरी आणि उच्च स्त्रियांमध्ये ती जाणवू लागली आहे. मात्र अल्पशा संख्येने पुढे गेलेल्यांचा अपवाद वगळता बहुसंख्यकांची कहाणी ही दु:खयात्रेची कहाणी आहे. स्त्रीत्वाचा आदर त्यांच्या वाटयाला आलेला नाही. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम अनेक समाज धूरीनांनी केले. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात क्रांतीचे वादळ घेऊन आलेल्या ज्योतीरावांनी स्त्रीला प्रतिष्ठेची, स्वातंत्र्याची भाषा दिली. विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेबांनी तिच्या सन्मानाला व स्वंयतेजाला नवे सामर्थ्य व स्वत्व मिळवून दिले. भारतीय स्त्रीच्या जीवनात आत्मशोध घेण्याची, स्वत्व शोधण्याची प्रेरणा देणारे बाबासाहेब हे संवेदनशील मनाचे, प्रखर बुध्दीमत्तेचे, पुरोगामी विचारांचे आणि कृतीवंत महापुरुष होते.

स्त्रीचा खरा उध्दार केवळ बाहय परिवेषातील बदलाने, भौतिक संपन्नतेने होत नाही तर मानसिक विकासातून होतो. ही जाणीव करुन देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्ती संग्रामाचे आदर्श व कृतीशील प्रेरक ठरले. आजही डॉ. आंबेडकरांच्या विचारांची गरज आहे हे प्रकर्षाने जाणवते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शुद्रांच्या प्रश्नावर विचार जेवढे प्रखर आहेत तेवढेच स्त्रियांच्या हक्कांबाबत जागृत आहेत. त्यांच्या लिखानात व लढयांमध्ये स्त्रीपुरुष समानतेचा आग्रह धरलेला दिसून येतो.

भारतीय समाज मनात ज्या धार्मिक ग्रंथाचे सर्वात अधिक खोलवर व्रण आहेत. तो ग्रंथ म्हणजे मनुस्मृती. मनुस्मृती या धर्मग्रंथातील क्रूर नियमांमुळे भारतीय समाजामध्ये शुद्र व स्त्रियांना हीन दर्जाची वागणूक मिळत गेली. या नियमांचा परिणाम काळाच्या परिवर्तनात तो नष्ट झाला नाही असे नव्हे तर तो आजही त्याचे स्वरुप बदलून तसाच कायम आहे. स्त्री आजही शोषित, गुलाम आहे. मनुस्मृतीने भयंकर बंधने व निकृष्ठ जीवन जगण्यासंबंधीचे नियम स्त्रियांकरिता करुन ठेवले. उदा.

१) स्त्रीयांना पहिला पती मेल्यानंतर दूसरा विवाह करण्याची परवानगी नाही. तो व्यभिचार ठरतो.
२) स्त्रिया स्वभावत:च व्यभिचारी असतात.
३) व्यभिचारशिलता , चंचलता, स्नेहाचा अभाव, पतीला व्यभिचारी मार्गाने फसविणे हा स्त्रियांचा प्रजापतीने दिलेला निसर्गत: स्वभाव असतो.
४) त्या रुप, वय पहात नाहीत तर पुरुष आहे एवढेच पाहून त्यांच्याशी जवळीक करतात.
५) 30 वर्षे वयाच्या पुरुषाने 12 वर्षाच्या कन्येशी विवाह करावा.
६) स्त्रीने लहानपणी वडिलांच्या आज्ञेत राहिले पाहिजे, पतीच्या मृत्यूनंतर तिने आपल्या पुत्राच्या आज्ञेत राहिले पाहिजे.स्त्रीने कधीच स्वतंत्रपणे विचार करु नये.
७) पिता, पती आणि पुत्र यांच्यापासून विभक्त राहण्याचे धैर्य स्त्रियांनी करु नये.
८) कुटुंबातील मुलगी, तरुणी व वृध्द स्त्री यांना कुटुंबातील व्यवहाराच्या बाबतीत स्वतंत्रपणे काहीही करण्याचा अधिकार नाही.
९) पत्नीने सदासर्वकाळ आनंदित राहिले पाहिजे, घरातील सर्व कामे व्यवस्थित करणे, भांडीकुंडी स्वच्छ ठेवणे, आणि घरखर्च हात राखून करणे या सर्व बाबतीत तिने समाधानपूर्वक वर्तन केले पाहिजे.
१०) स्त्री हत्या हा क्षुल्लक गुन्हा आहे. इ.

हिन्दू या कायदयांना स्त्रियांच्या जीवनाचे उच्चतम आदर्श मानतात. डॉ. आंबेडकरांनी २६डिसेंबर 1927 रोजी महाड येथे भरलेल्या परिषदेत मनुस्मृतीचे दहन करुन प्रतिक्रांती विरुध्द क्रांती केली. म्हणून 'मनुस्मृती दहन' हा स्त्री स्वांतत्र्य प्रेरणांचा दैदिप्यमान उज्वल अविष्कार आहे. सर्व समाजातील स्त्रियांना मुक्ती लढयाचे वैचारिक बळ डॉ. बाबासाहेबांनी दिले. अंतकरणात कोटी-कोटी सूर्य प्रज्वलीत केले. नव्या आदर्शांची जाण दिली. त्यांची अस्मिता फुलविली.

डॉ. बाबासाहेब म्हणतात "स्त्रियांनी गृहलक्ष्मी तेवढे व्हावे, त्याच्यापुढे प्रगतीची मजल जाऊ नये का? ही मर्यादा अबला उन्नतीप्रितर्थ झटणाऱ्या बऱ्याच सुधारकांनी आपल्यापुढे ठेवल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. आमच्यामते अशाप्रकारचे द्योतक आहे. प्रत्येक व्यक्तीमात्राला पूर्णावस्थेस जाण्यास समाजाने अवसर दिला पाहिजे. हे तत्व जर एकदा मान्य झाले तर मग स्त्रियांच्या पुढे असले हलके ध्येय ठेवण्यात यावे याचे आम्हास नवल वाटते. ध्येयप्राप्ती न होणे हा काही गुन्हा नाही. पण कमी प्रतीचे ध्येय डोळयांपुढे ठेवणे हा मात्र मोठाच गुन्हा आहे. अशा प्रकारे एका मुक नायकाने स्त्रीला शब्दाचे, वाणीचे, सामर्थ्य दिले. तिला आकाश कवेत घेण्याचे स्वप्न पहावयास शिकविले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना जी शिकवण दिली त्यामध्ये स्त्रियांनी शिक्षण घेतले पाहिजे हा कानमंत्र होता. शिक्षणातून स्त्रियांचा विकास होईल यावर त्यांची नितांत श्रध्दा होती. त्या दृष्टीने विचार रुजविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना जो उपदेश केला होता. तोही अत्यंत महत्वपूर्ण असा आहे. आपल्या मुलांना शिक्षण दया, त्यांच्यात

महत्वाकांक्षा निर्माण करा. ते फार मोठे असल्याची प्रेरणा त्यांच्या मनात रुजवा. त्यांच्या मनातून सर्व प्रकारची हीनत्वाची भावना काढून टाका, त्यांची लग्ने लवकर करण्याची घाई करु नका. तसेच लग्नानंतर जास्त मुले निर्माण करणे हा अपराध आहे. हे लग्न करणाऱ्यांनी लक्षात घ्यावे. मुलाबाळांना चांगल्या स्थितीत ठेवण्याची जबाबदारी मातापित्यांची आहे. लग्न करणाऱ्या प्रत्येक मुलीने आपल्या पतीच्या पक्षाच्या बाजूने राहिले पाहिजे. त्याची दासी म्हणून नव्हे तर बरोबरीच्या नात्याने व मित्र म्हणून. या उपदेशाप्रमाणे तुम्ही वागलात तर तुम्ही स्वत:च्या व समाजाचा सन्मान वाढवाल. गलिच्छ चालीरिती सोडून दया, दागिन्यांचा हव्यास टाळा, स्त्रीचा खरा उध्दार केवळ बाहय वेशातील बदलाने, भौतिक संपन्नतेने नाही तर मानसिक विकास घडल्याने होतो. दारुबाज नवऱ्यांना, भावांना अगर मुलांना जेवायला घालू नका. मुलींना शिक्षण दया, ज्ञान आणि विद्या या गोष्टी स्त्रियांनाही आवश्यक आहेत असे त्यांनी सांगितले.

१९२८ साली विधीमंडळात काम करत असताना बाबासाहेबांनी स्त्री कामगारांच्या हिताच्या दृष्टीने मांडलेल्या विधेयकास जोरदार पाठिंबा दिलेला आहे. स्त्री कामगारास नोकरीवर ठेवणे मालकवर्गास फायदेशीर पडते. म्हणून स्त्री कामगारांना आवश्यक असणाऱ्या प्रसुतीनंतरच्या काळात विश्रांती मिळण्याच्या दृष्टीने त्यांचा त्या काळातील खर्च मालकांनी सोसणे योग्यच आहे. स्त्री कामगारांना वेनत नि भरपगारी रजा दयावी असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

सामाजिक समतेच्या आंदोलनात स्त्री-पुरुष समानता यावर फुले आगरकरांनी जेवढा भर दिला तेवढाच भर बाबासाहेबांनी स्त्री मुक्तीच्या संदर्भात हिन्दू कोड बिलाच्या रुपाने दिलेला होता. कर्मकांड, अंधश्रध्दा दूर सारण्याच्या कामी स्त्रीच पुढाकार घेऊ शकते यावर त्यांची प्रगाढ श्रध्दा होती. स्त्रियांना पुरुषांप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात समान स्थान व समान दर्जा, हक्क मिळावा यासाठी १९५१ साली हिन्दू कोडबिलाच्या संदर्भात तर बाबासाहेबांनी निर्णायक लढाईसाठी पराकाष्ठा केली. परंतु हे बील कितीही उपयोगी व चांगले असले तरीही एका अस्पृश्याने हिन्दू स्त्रियांच्या उध्दारार्थ हे बील मांडावे हे मनुवादी सनातनी मंडळींना रुचले नाही. त्यांनी जोरदार विरोध केला. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क देणे त्यांना मुळीच पटले नाही. या बिलामुळे प्रथमच स्त्रियांना-

१) घटस्फोट देण्याचा अधिकार घटस्फोट मिळाल्यास पोटगी मागण्याचा अधिकार
२) एक पत्नी असताना पतीला दुसरी पत्नी करण्याची मनाई असलेला अधिकार.
३) दत्तक घेण्याचा अधिकार.
४) वडिलोपार्जित संपत्तीत हिस्सा मिळण्याचा अधिकार
५) स्त्रियांचा स्वत:च्या मिळकतीवर अधिकार
६) मुलीला वारसा घेण्याचा अधिकार
७) आंतरजातीय विवाह करण्याचा अधिकार
८) स्वत:चा वारस निश्चित करण्याचा अधिकार इ.

मिळणार होते. मनुस्मृतीने स्त्रियांवर केलेले अन्याय या बिलाव्दारे नष्ट होणार होते. स्त्रियांचा दर्जा उंचावणार होता. यासाठी डॉ. आंबेडकरांनी जीवापाड परिश्रम घेतले होते. परंतु हे बिल पास झाले नाही. म्हणून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. राजीनामा देण्याची अनेक कारणे असतील परंतु तात्कालिक कारण घडले ते म्हणजे हिन्दू कोड बिल. शेवटी तुकडया-तुकडयांनी हे बिल पास करण्यात आले. जसे विवाह, घटस्फोट, संपत्ती, पोटगी, हुंडा, बालविवाह, दत्तक, स्त्री धनासंबंधी अधिनियम तथा विशेष विवाह अधिनियम-1954, हिन्दू विवाह कायदा-1959, हिन्दू उत्तराधीकारी विधेयक-1956, हिन्दू दत्तक ग्रहण निर्वाह विधेयक-1956, हुंडा प्रतिबंध अधिनियम – 1965, मातृत्व लाभ अधिनियम, बालविवाह प्रतिबंध अधिनियम इ. मुळे भारतीय स्त्री वास्तवात एक सुरक्षित जीवन जगू शकते.

देशाला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यानंतर केवळ शिक्षणच नाही तर राजकिय स्वातंत्र्य , समता, न्याय तसेच आर्थिकदृष्टयाही स्त्री बलशाली व्हावी म्हणून स्त्रियांना पुरुषांप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात समान स्थान व समान दर्जा- हक्क मिळावा यासाठी कायदयाची तरतुद करुन बाबासाहेबांनी ‘स्त्री दास्य विमोचन’ केले. आज स्त्रिया वकील, इंजिनियर, डॉक्टर, वैमानिक, शिक्षिका, प्राध्यापिका या वेगवेगळया क्षेत्रात पुरुषांच्या खांदयाला खांदा लावून काम करताना दिसतात. ‘पायाखालच्या धुळीला संधी मिळाली की ती सुध्दा मस्तकी चढते. महिला या तर माणूसचं’. एकूणच महिलांच्या कतृत्वावर एवढा अढळ विश्वास ठेवणारा महापुरुष बाबासाहेबच.

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेबांसारख्या महापुरुषांनी लोकांचे प्रवाद झेलून स्त्रियांना वर आणले, समतेचे वारे सुरु झाले. डॉ. बाबासाहेबांनी लोकशाहीचे स्वरुप सांगताना भयापासून मुक्ती ही कल्पना मांडली होती. आज भिती निर्माण करुन एक लाट तयार करुन त्या लाटेवर आरुढ होण्याचे राजकारण घाटले आहे. त्याच पुरोगामी समतावादी विचारांचा झेंडा म्हणजेच डॉ. बाबासाहेबांचे स्त्रियांविषयकचे विचार आहेत. या विचारांच्या आधाराने अशा सनातनी विचाराचा पराभव करणे ही जबाबदारी स्त्रियांवरही आहे. हे स्त्रियांना पटवून त्यांच्या मनात आंबेडकरांचे विचार रुजविणे ही काळाची गरज आहे. तेवढयासाठीच हा लेखन प्रपंच.

जगाला दहशतीच्या छायेपासून मुक्त करण्याचा मार्ग प्रज्ञा, शिल, करुणा ही बौध्द धम्माची त्रिसुत्री दाखवेल हा विश्वास ठेवत, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला आणि स्मृतीला विनम्र अभिवादन !

**संदर्भ**

१. वंदना भागवत , आंबेडकर आणि स्त्रीप्रश्न
२ . डॉ . बी . आर . आंबेडकर , स्त्रीदास्य विमोचन
३. डॉ . रेखा बडोदेकर , डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार